# आकाशातील शाळा

जच्या दैनंदिनीप्रमाणे
आमच्या शाळेतील वर्ग सुरु
वर्गात तास सुरु असताना
एक गट उठतो आणि तासाला
या शिक्षकाची परवानगी
वर्गाबाहेर पडतो. जवळच
या एक खोलीचा ताबा घेतो.
तिशय आकर्षक बांधकाम
या आणि दोन मोठाल्या
भिंती असलेला हा वर्ग.
विशिष्ट रचनेत असलेले पाच
. दुसरीकडे भिंतीवर मोठा
क्रीन. मुले टीव्ही स्क्रीन सुरु
मग स्क्रीनला जोडलेला
आणि इंटरनेट कनेक्शन सुरु
काईपच्या स्क्रीनवरुन मुले
परदेशात बसलेल्या ग्रॅनीचे
धून व्हिडिओ कॉल सुरु
क्षणात स्क्रीनवर त्यांची
ग्रॅनी अवकाशातून एखादा
अवतरावा तशी अवतरते.
उत्साहाने मुले स्क्रीनवर
या आपल्या ग्रॅनीला भर दुपारी
ग, अथवा गुड इव्हिनिंग किंवा
(स्पॅनिशमध्ये हॅलो) म्हणत
. ग्रॅनी मुलांना गुड ऑफ्टरनून
तर कधी-कधी एखादी
यातील ग्रॅनी मुलांनी
ल्यानुसार नमस्कार किंवा
म्हणते आणि मग सुरु होते
आकाशातील शाळा.
शिकण्याची आणि
ण्याची पद्धत फार वेगळी
आजचे आधुनिक तंत्रज्ञान
आमची सहावी-सातवीची
देशातील ग्रॅनींबरोबर गप्पा
असतात. पूर्णतः मराठी
न शिकणारी ही मुले आणि
गंधही नसणारी त्यांची ग्रॅनी.
पली ग्रॅनी काय विचारत आहे,
ाय लक्षपूर्वक ऐकत असतात.
बोलण्याचा अर्थ लावत
आणि आपल्या स्वतःच्या
ध्ये उत्तर देत असतात. तेही
ही शिक्षकाच्या मदतीशिवाय.
मजले नाही, 'will you
at please?', असे
.. तरीही एखादा शब्द
नाही, तर आपल्या ग्रॅनीला तो
करायला सांगतात. शब्द
नवखा असेल, तर मुले
च इंटरनेटवरील ऑनलाईन
री पाहतात. गप्पांमधून मग
ॲक्टिव्हिटी सुरु होते.
ी मुलांना रोबोट मानवाची
घेऊ शकतील का? असा
सहज उत्तर न मिळणारा प्रश्न
मुले आपल्या जागेवरून उठून
गांचे ग्रुप करुन शेजारील पाच
ंचा ताबा घेतात. त्यांचा शोध
ो. ग्रॅनी मुलांना ग्रुपमध्ये काम
सहज पाहू शकत असते.
धून मुलांना प्रोत्साहन देत
मध्येच कोणाला काही
यचे असेल, तर स्क्रीनसमोर


येऊन ग्रॅनीला विचारतात आणि पुन्हा आपल्या कामाला लागतात.

मुले गुगलवरती चित्र, व्हिडिओ यांच्या स्वरुपात मिळणारी माहिती एकत्रित करतात. या साऱ्या प्रक्रियेतून इंटरनेटवरून थेट उत्तर सापडत नाही याची जाण मुलांना येऊ लागते. मिळालेल्या माहितीच्या आधारे विचार करावा लागतो. माहितीवर प्रक्रिया करून ज्ञानात रुपांतर करावे लागते. हा विचार करताना इतरांशी चर्चा करणे, त्यांचे विचार समजून घेणे हेदेखील महत्वाचे आहे. हे मुलांच्या कृतीतून दिसत असते. हाच Self Organized Learning Environment [SOLE] चा गाभा आहे आणि असे प्रश्न विचारण्यासाठी ग्रॅनीलादेखील होमवर्क करावा लागतो.

जसजशी माहिती पूर्ण होत जाते, तसतशी मुले एकत्र येऊन आपल्या ग्रॅनीसमोर मांडतात. मुलांनी स्वतः शोधलेली माहिती मुले चांगले नियोजन करून सादर करीत असतात.

कधी-कधी मुले आपल्या लाडक्या ग्रॅनीला एखादे गाणे म्हणायला लावतात. मग ग्रॅनी मुलांना एखादे गाणे म्हणण्याची विनंती करते. मुले आम्ही पुढच्या तासाला म्हणू असे वचन देतात. पुढच्या तासाला एका आठवड्याचा अवधी असतो. मुले आपल्या ग्रॅनीसाठी सुंदरसे गाणे निवडून रोज सराव करीत असतात. आणि मग तबला, पेटी आणि इतर वाद्ये स्वतः वाजवून मुले एक सुंदरसे गाणे जेव्हा सादर करतात, तेव्हा दूरदेशी बसलेल्या ग्रॅनी खरोखर भारावून जातात.

वर्गातील आपल्या शिक्षकांचे आणि मुलांचे नाते जेवढे जिव्हाळ्याचे असते, तेवढेच मुलांचे आपल्या ग्रॅनीशी देखील असते. ती आपल्या ग्रॅनीचा वाढदिवस साजरा करतात. तिला गिफ्ट पाठवितात. हे सर्व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोपे झाले असले, तरी ही मुले स्वतःच्या हस्ताक्षरात पत्र लिहून पोस्टाने आपल्या ग्रॅनीकडे पाठवितात. ग्रॅनीकडन येणाऱ्या पत्रांची मुले उत्सुकतेने वाट पाहत असतात. आपल्याला आलेली पत्रे मुले जिवापाड सांभाळून ठेवत असतात. तंत्रज्ञानाचा फक्त माध्यम म्हणून वापर करून मुले आपली सृजनशीलता कशा प्रकारे जोपासतात हे जाणवते. ग्रॅनीबरोबर मुलांचे नाते अतिशय घट्ट होताना सर्वांना जाणवत असते.



ग्रॅनी मुलांना तिच्या घराची, बागेची सफर घडविते, तर मुले लॅपटॉप हातात घेऊन संपूर्ण शाळा दाखवितात. शाळेतील प्रत्येक ठिकाणाची ग्रॅनीला माहिती सांगतात. शाळेत होणारे कार्यक्रम आणि इतर घडामोडी यामध्ये आपल्या ग्रॅनीला सहभागी करून घेतात. ग्रॅनीच्या देशात होणारी बर्फवृष्टी डोळ्यांनी जेव्हा मुले अनुभवतात, तेव्हा त्यांच्या आनंदाला सीमा राहत नाही.

मुले पूर्णतः इंग्रजीमधून संभाषण करीत असतात. मुलांचे इंग्रजी संभाषण कौशल्य तर वाढत असतेच; पण त्याहीपलीकडे जाऊन मुले आत्मविश्वासाने आणि सृजनशीलपणे नवनवीन ज्ञान आणि संगणक कौशल्ये आत्मसात करीत असतात. याबरोबर दुसऱ्या संस्कृतीशी ओळख करून घेणे, आपल्या संस्कृतीची ओळख करून देणे, ग्रॅनींनी विचारलेल्या प्रश्नांबद्दल एकमेकांशी चर्चा करणे, त्यांची उत्तरे स्वतःहून शोधणे, अशी अनेक कौशल्ये मुलांना येऊ लागलेली दिसतात. मुलांचा वाढलेला आत्मविश्वास तर अवाकच करणारा आहे.

आमच्या या आकाशातील शाळेची सुरुवात झाली ती मागील शैक्षणिक वर्षी. TED अवॉर्ड मिळालेले शिक्षणतज्ज्ञ प्रा. शुगातो मित्रा यांच्या Self Organized Learning Environment [SOLE] या उपक्रमांतर्गत प्रगत शिक्षण संस्थेच्या कमला निबकर बालभवन, फलटण या शाळेत ग्रॅनी क्लाऊड हा कार्यक्रम सुरु झाला. या प्रकल्पामध्ये भारतातील तसेच परदेशातील विविध शाळांचा समावेश आहे. या शाळा पुढील दोन वर्षे होणाऱ्या शैक्षणिक संशोधनात भाग घेणार आहेत.

SOLE प्रकल्पांतर्गत कमला निबकर बालभवनला सुसज्ज अशी Cloud Lab तयार करून मिळाली आहे.. आता आमची शाळा School in the Cloud म्हणून ओळखली जाते. Cloud Lab मिळालेली कमला निबकर बालभवन ही जगातली सातवी, भारतामधील पाचवी, तर महाराष्ट्रामधील एकमेव शाळा आहे.

शिक्षणात तंत्रज्ञान हा नेहमीच चर्चेचा आणि वादाचा विषय ठरला आहे. शेवटी तंत्रज्ञान ही कोणती जादूची कांडी नाही, जिचा शिक्षणामध्ये समावेश करून आपण शिकण्यात आणि शिकविण्यात आमूलाग्र बदल करू शकू. नवे ज्ञान आत्मसात करण्याची म्हणजे शिकण्याची प्रत्येकाची स्वतःची एक पद्धत असते. ती जागृत करण्याची आणि परिपक्व करण्याची गरज असते. ती जेव्हा मुलांना गवसते, तेव्हा मग खऱ्या अर्थाने शिकणे सुरु होते. असे शिकणे नेहमीच दर्जेदार आणि आनंदी असते.

शिकण्याची प्रक्रिया सुलभ आणि सखोल करण्यासाठी, शिकणे आनंदी आणि सृजनशील करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर कसा होऊ शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे आमची आकाशातील शाळा आहे. इथे शिकण्यासाठी इंटरनेट हे माध्यम आहे, म्हणून तिला आकाशातील शाळा म्हटले खरे; पण खरे सांगायचे तर ती आकाशातली शाळा आहे, कारण इथे मुलांना आणि त्यांच्या कल्पनांना मुक्त असे अवकाश आहे.

**■ प्रकाश अनभुले,**
फलटण, जि. सातारा